# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:26.10.2024** **वारःशनिवार**

---

1. विधानसभा निवडणुकीसाठी कालही अनेक मंत्री, वरीष्ठ नेत्यांचे उमेदवारी अर्ज दाखल
2. विविध राजकीय पक्षांच्या उमेदवार याद्या जाहीर होताच नाराजीनाट्यालाही सुरुवात
3. मतदान जनजागृतीसाठी राज्यात विविध उपक्रमांचं आयोजन आणि
4. पुणे कसोटी क्रिकेट सामन्यात भारताचा पहिला डाव 156 धावांमध्ये संपला. दुसऱ्या दिवसअखेर न्यूझीलंडकडे 301 धावांची आघाडी

<u>**उमेदवारी अर्ज**</u>

राज्यात विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. एकीकडे विविध राजकीय पक्षांच्या उमेदवारी याद्या जाहीर होत असतानाच उमेदवारी अर्ज भरण्यासाठी नेते आणि त्यांच्या कार्यकर्त्यांची तत्परताही दिसून येत आहे.

कालही राज्यातल्या अनेक नेत्यांनी शक्ती प्रदर्शन करत आपापले उमेदवारी अर्ज दाखल केले. भाजपा नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दक्षिण पश्चिम नागपूर या आपल्या परंपरागत मतदारसंघातून काल उमेदवारी अर्ज दाखल केला. केंद्रिय मंत्री नितीन गडकरी, भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे तसंच महायुतीचे नेते आणि कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

रत्नागिरी विधानसभा मतदारसंघात उद्योगमंत्री उदय सामंत यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. भाजपा नेते आशिष शेलार यांनी वांद्रे पश्चिम मतदार संघातून, मनसे नेते बाळा नांदगावकर यांनी शिवडीतून आणि नवी मुंबईतल्या ऐरोली मतदारसंघातून महाराष्ट्र स्वराज्य पक्षाच्या अंकुश कदम यांनी उमेदवारी दाखल केली.

अहिल्यानगरमध्ये कर्जत जामखेड मतदारसंघातून भाजपाचे राम शिंदे, कोपरगाव मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसचे आशुतोष काळे आणि श्रीरामपूरमधून संतोष कांबळे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. सिंधुदुर्ग जिल्ह्यात सावंतवाडी मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या बंडखोर उमेदवार अर्चना घारे-परब यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.

गडचिरोली विधानसभा मतदारसंघातून विद्यमान आमदार डॉक्टर देवराव होळी यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. या मतदारसंघात महायुतीनं अद्याप उमेदवाराच्या नावाची घोषणा केलेली नाही. मात्र, महायुती आपल्यालाच उमेदवारी देईल, असा विश्वास होळी यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केला. यवतमाळ जिल्ह्यात वणी मतदारसंघात मनसेच्या राजू उंबरकर यांनी तर अकोल्याच्या अकोला पूर्व मतदारसंघातून भाजपाचे रणधीर सावरकर यांनी उमेदवारी अर्ज भरला.

**उमेदवारी अर्ज**

विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याच्या कालच्या चौथ्या दिवस अखेर 991 उमेदवारांचे 1292 उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत, अशी माहिती, मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे. 29 ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी अर्ज भरता येणार आहेत; 30 ऑक्टोबरला या अर्जांची छाननी होईल आणि 4 नोव्हेंबरपर्यंत अर्ज मागे घेता येतील. विधानसभा निवडणुकीसाठी मतदान 20 नोव्हेंबरला होत असून 23 नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे.

**राष्ट्रवादी उमेदवार यादी**

विधानसभा निवडणूकीसाठी उमेदवारांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची दुसरी यादी काल पक्षाचे नेते अजित पवार यांनी जाहीर केली. पक्षानं झिशान सिद्दीकी यांना वांद्रे पूर्वमधून, सना मलिक यांना अणुशक्तीनगरमधून, संजय काका पाटील तासगांव कवठेमहांकाळ, निशिकांत पाटील इस्लामपूर आणि माजी खासदार प्रतापराव चिखलीकर यांना लोहा मतदारसंघातून उमेदवारी जाहीर केली आहे. पुण्यात वडगांव शेरीमधून सुनील टिंगरे आणि शिरुरमधून ज्ञानेश्वर कटके राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार असतील.

**मनसे उमेदवारी**

मनसेनं विधानसभेसाठी उमेदवारांची चौथी यादी काल जाहीर केली. यात पुण्यातल्या कसबा मतदारसंघात गणेश भोकरे, कोल्हापूर उत्तरमध्ये अभिजीत राऊत, कलिनामधून संदीप हुटगी, केजमधे रमेश गालफडे आणि चिखलीमधून गणेश बरबडे यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

**उमेदवारी विरोध-नंदूरबार, पुणे**

नंदूरबार जिल्ह्यात भाजपातून राजीनामा देऊन काँग्रेसमध्ये गेलेले राजेंद्र गावित यांना काँग्रेस पक्षानं शहादा विधानसभा मतदार संघातून उमेदवारी दिल्यानं काँग्रेसच्या इच्छुक उमेदवारांनी नाराजी जाहीर केली आहे. या निर्णयाचा पुनर्विचार न केल्यास सांगली पॅटर्न वापरण्याचा इशारा या इच्छुकांनी पत्रकार परिषदेत दिला.

पुण्यात काँग्रेसचे माजी उपमहापौर आबा बागुल यांनी पर्वती विधानसभा मतदारसंघातून अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. महाविकास आघाडीच्या जागावाटपात हा मतदारसंघ काँग्रेसला मिळावा अशी मागणी बागुल यांनी पक्षश्रेष्ठींकडे केली पण महाविकास आघाडीचा उमेदवार जाहीर होण्यापूर्वीच त्यांनी अर्ज दाखल केला आहे. या मतदारसंघातून भाजपच्या आमदार माधुरी मिसाळ या चौथ्यांदा निवडणूक लढवत आहेत.

**काँग्रेस नाराजी-नाशिक**

नाशिक शहरात काँग्रेस पक्षाच्या वाट्याला एकही विधानसभा मतदारसंघ न आल्यामुळे मित्र पक्षांच्या विरोधात मैत्रीपूर्ण निवडणूक लढवण्यास संधी द्यावी अशी मागणी नाशिक शहर काँग्रेस पक्षानं केली. पक्षाच्या काल झालेल्या मेळाव्यात ही मागणी करण्यात आली.

**महायुती जागा वाटप**

महायुतीमध्ये 277 जागांवर एकमत झालं असून उर्वरित जागांवर दोन दिवसांत निर्णय होईल, अशी माहिती भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल दिली. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही महायुतीचा केवळ 11 जागांवरील निर्णय अद्याप व्हायचा आहे असं इंदापूर इथं सांगितलं.

**<u>महाविकास आघाडी जागा वाटप</u>**

महाविकास आघाडीतले तिन्ही पक्ष प्रत्येकी 90 जागा लढवणार आहेत. उरलेल्या 18 जागा मित्र पक्षांना दिल्या जातील, असं काँग्रेसच्या विधीमंडळ पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात यांनी काल सांगितलं.

**<u>मतदान जनजागृती</u>**

राज्यातल्या विधानसभा निवडणुकीत मतदानाचं प्रमाण वाढावं यासाठी निवडणूक आयोग आणि स्थानिक प्रशासनाकडून विविध उपक्रम राबवले जात आहेत. सातारा जिल्ह्यात महाबळेश्वर तालुक्यात शालेय विद्यार्थ्यांनी प्रभात फेरी काढून आणि रांगोळी, चित्रं, घोषणाफलक यांच्या माध्यमातून मतदानाविषयी जनजागृती केली. तर माण तालुक्यात वाघमोडेवाडी इथं विद्यार्थ्यांनी मतदानाचं महत्त्व सांगणारं घोषवाक्य असलेले आकाशकंदिल तयार केले. पाटण तालुक्यात महिलांनी प्रभात फेरी काढून मतदानाचं आवाहन केलं. तसंच वयोवृद्ध स्त्री पुरुष मतदारांचा सत्कार करण्यात आला.

नवी मुंबईत शाळा महाविद्यालयांमध्ये मतदार जागृतीविषयक रांगोळी स्पर्धा घेण्यात आली. कोपरीगाव इथल्या महापालिकेच्या शाळेतल्या विद्यार्थ्यांनी मतदानाचा संदेश देणारी पत्रं आपल्या पालकांना लिहीली. त्याचबरोबर बसस्थानक, रेल्वेस्थानक अशा विविध ठिकाणी मतदारांना प्रत्यक्ष भेटून मतदानाचं आवाहन करण्यात आलं. परभणी जिल्ह्यात महिलांच्या गेम शो च्या माध्यमातून तसंच संगीत आणि नाट्य सादरीकरणातून मतदान जनजागृती करण्यात आली.

हिंगोली जिल्ह्यात कळमनुरी तालुक्यात विद्यार्थ्यांनी मतदानाचं महत्त्व सांगणारी दिवाळीची शुभेच्छा पत्रं तयार केली असून ही शुभेच्छापत्रं पाठवून ते पालक आणि नातेवाईकांमध्ये मतदान जागृती करणार आहेत. अहिल्यानगर जिल्ह्यात पाथर्डी तालुक्यात दुलेचांदगाव इथं श्री सच्चिदानंद बंडोबा महाराज माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मानवी साखळीद्वारे मतदानाचा संदेश दिला.

मतदारांना मतदानाचं आवाहन करताना पुण्यातील नवमतदार हर्षा नेहेते म्हणाली.....

**<u>मतदान ओळखपत्र</u>**

मतदानासाठी मतदार ओळखपत्रासह अन्य 12 ओळखपत्रं ओळखीचा पुरावा म्हणून ग्राह्य धरली जाणार आहेत. यापैकी कोणताही एक पुरावा दाखवून मतदारांना मतदान करता येईल अशी माहिती मुंबई जिल्हा निवडणूक अधिकारी संजय यादव यांनी दिली. यामध्ये आधार कार्ड, मनरेगा रोजगार ओळखपत्र, बँक अथवा टपाल खात्याची छायाचित्रासह खातेपुस्तिका, केंद्र सरकारचे आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, वाहन चालक परवाना, पॅन कार्ड, पासपोर्ट, निवृत्ती वेतनाचे दस्तावेज तसंच सरकारी, सार्वजनिक कंपन्यांचे कर्मचारी ओळखपत्र इत्यादींचा समावेश आहे. मतदारांनी मतदान केंद्रावर जाताना मतदार माहिती चिठ्ठी आणि मतदार ओळखपत्र किंवा वरील 12 पैकी कोणताही एक पुरावा सोबत घेऊन जाणं आवश्यक आहे असं निवडणूक अधिकारी कार्यालयानं नमूद केलं आहे.

**<u>एक्झीटपोल</u>**

दरम्यान 13 नोव्हेंबर रोजी सकाळी 7 पासून ते 20 नोव्हेंबर  रोजी संध्याकाळी साडे सहा पर्यंतच्या कालवधीत विधानसभा निवडणूकीच्या निकालांचे कल किंवा अंदाज म्हणजेच एक्झीट पोल, ओपिनियन पोल, प्रसार माध्यमांवर प्रसारित करण्यास केंद्रीय निवडणूक आयोगाने बंदी घातली आहे.

**राजकीय जाहिरात**

विधानसभा निवडणूक प्रचारासाठी राजकीय जाहिरातींचा प्रत्यक्ष वापर किंवा प्रसारण करण्यापूर्वी या जाहिरातींसाठी राज्यस्तरीय माध्यम प्रमाणीकरण आणि सनियंत्रण समितीची परवानगी घेणं आवश्यक आहे असं निवडणूक आयोगानं कळवलं आहे. यासाठी जिल्हा स्तरावर जिल्हा माध्यम प्रमाणीकरण आणि सनियंत्रण समिती नेमण्यात आल्याचं मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं म्हटलं आहे.मुद्रित माध्यमांमध्ये मतदानाच्या आधीच्या तसंच मतदानाच्या दिवशी प्रकाशित केल्या जाणाऱ्या राजकीय जाहिरातींसाठीही राजकीय पक्ष, उमेदवार, व्यक्ती यांनी पूर्वपरवानगी घेणं आवश्यक आहे.

**सीव्हिजिल**

विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यापासून कालपर्यंत सी व्हिजिल ॲपवर आचारसंहिता उल्लंघनाच्या 1259 तक्रारी दाखल झाल्या आहेत. त्यातील 1250 तक्रारी निकाली काढल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं दिली आहे. दरम्यान, राज्य आणि केंद्र सरकारच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांनी केलेल्या कारवाईत बेकायदा पैसे, दारू, अंमली पदार्थ आणि मौल्यवान धातू इत्यादी स्वरुपात 100 कोटी 40 लाख रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली असून राज्यात आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी सुरु असल्याचं मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं सांगितलं.

**रोहिणी गोडबोले -निधन**

पद्मश्री पुरस्कारानं सन्मानित प्रसिद्ध भौतिक शास्त्रज्ञ प्राध्यापिका डॉक्टर रोहिणी गोडबोले यांचं काल निधन झालं, त्या 72 वर्षांच्या होत्या. बंगळुरू इथल्या भारतीय विज्ञान संस्थेत संशोधन विभागात त्या कार्यरत होत्या. मुळच्या पुण्याच्या रहिवासी असलेल्या रोहिणी गोडबोले यांचं प्राथमिक शिक्षण हुजुरपागा शाळेत झालं होतं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. विज्ञानजगतात महिलांचं स्थान सक्षम करण्यात त्यांनी मोलाचं योगदान दिलं, रोहिणी गोडबोले यांचं कार्य पुढील पिढ्यांना मार्गदर्शन करत राहतील, असं मोदी यांनी शोकसंदेशात म्हटलं आहे.

**क्रिकेट**

भारत आणि न्यूझीलंड संघांदरम्यान पुण्यात सुरू असलेल्या कसोटी क्रिकेट सामन्यात काल दुसऱ्या दिवशी न्यूझीलंडच्या दुसऱ्या डावात 5 गडी बाद 198 धावा झाल्या होत्या. त्यामुळे न्यूझीलंडला पहिल्या डावातल्या 103 धावांसह एकंदर 301 धावांची आघाडी मिळाली आहे. तत्पूर्वी भारताचा पहिला डाव 156 धावांमध्येच संपुष्टात आला. न्यूझीलंडच्या मिशेल सॅन्टनरनं 17 षटकं आणि 3 चेंडूत भारताचे सात गडी बाद केले.

**हवामान**

राज्यात आज सर्वत्र हवामान कोरडं असेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्राचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.